# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र.१ जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा,
मुंबई ४०० ००५ **दूरध्वनी २२१६ ३९६४/२२१६ ३९६५**
**ई-मेल : mercindia@merc.gov.in**
**संकेत- स्थळ: www.merc.gov.in**

**MERC**

**जाहिरात क्र. ३२/२०२३-२४**

## जाहीर सूचना – प्रकरण क्र.३/एसएम/२०२४

## आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता नूतनशील ऊर्जेच्या दराबाबत आयोगाने स्वतःहून तयार केलेल्या प्रारुप आदेशावर सुनावणी

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१९ मधील विनियम ८ ला अनुसरुन, महाराष्ट्रातील नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानांकरीता आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सामान्य (जेनेरिक) वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आयोगाने स्वत:पुढाकार घेऊन प्रारुप आदेश तयार केला असून तो आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

२. आयोग याद्वारे सदर प्रारुप आदेशावर जनतेकडून हरकती व सूचना मागवित आहे. इच्छुक व्यक्ती/संबंधितांना आयोगाच्या संकेतस्थळावरील **'E-public consultation'** या टॅबद्वारे त्यांच्या सूचना/हरकती इंग्रजी किंवा मराठी भाषेमध्ये लेखी अपलोड करता येतील **(www.merc.gov.in/e-public-consultation)** या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास, संबंधित व्यक्ती कामकाजाच्या सर्व दिवसांमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या दरम्यान मोबाईल क्र. ८९२८०७१५२२ वर किंवा **suggestions@merc.gov.in** या ई-मेल आयडीवर संपर्क साधू शकतात.

ज्या व्यक्ती/हितसंबंधितांनी आयोगाच्या **'E-public consultation'** या टॅबवर सूचना आणि हरकती दाखल केल्या असतील त्यांस त्यांच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्ती/हितसंबंधितांना इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करणे शक्य नाही त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५** या पत्त्यावर पाठवावी.

कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने हरकती पाठविण्यात येत असल्यास तसे त्यात नमूद करावे. **२४ फेब्रुवारी, २०२४** रोजी सायंकाळी ६.०० नंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि / किंवा हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना / हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

३. वरील परिच्छेद (२) नुसार, अभिप्राय / हरकती पाठविणाऱ्या आक्षेपकाला त्याचे म्हणणे ई-जन सुनावणीमध्ये व्यक्तिश: मांडावयाचे असल्यास सूचना/हरकती दाखल करताना त्याने तसे विशेषत्वाने नमूद करावे. अशा प्रकरणी, वैध ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य राहील. आयोग, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, अशा प्रेषक/आक्षेपकाला ई-सुनावणीमध्ये त्याचे म्हणणे मांडण्याची परवानगी देईल. जाहीर ई–जन सुनावणीत भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती आयोगाने दि. १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी जारी केलेल्या "आयोगाच्या याचिकेच्या ई-सुनावणीसाठी अनुसरावयाची परिचालनात्मक कार्यपध्दती आणि प्रोटोकॉल वरील कार्यप्रणाली निर्देशां चे पालन करतील.

४. **दि.२७ फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे ई-सुनावणी घेण्यात येईल. या प्रयोजनासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**सही/-**

दिनांक : ०३/०२/२०२४ — **(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**

ठिकाण : मुंबई — **सचिव, मविनिआ**